# मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

१५ जून १९७० रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी द्वारा मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. गुरुवर्य शंकररावजी कानिटकर यांच्या प्रेरणेतून गुरुवर्य ताटके यांच्या पुढाकारातून संस्थेचे हे पहिले वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. विशेष म्हणजे, महाविद्यालय सुरु करण्यासाठीची शासनाकडून परवानगी मागण्याआधीच महाविद्यालयाची इमारत पूर्णपणे बांधून तयार होती. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून अनुभवी व गुणवंत शिक्षकांची नेमणूक महाविद्यालयात संस्थेद्वारा सुरुवातीपासूनच करण्यात आली होती.

महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीच्या दुसऱ्या दशकांमध्ये, म्हणजे शैक्षणिक वर्ष १९८०-८१ ते १९८९-९० या कालावधीत एम. कॉम. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यात आला होता. या कालावधीमध्ये एम. फिल. व पीएच. डी. चे आणखी एक संशोधन केंद्र, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने सुरु करण्यात आले. ते संशोधन केंद्र वनस्पतीशास्त्र विषयाचे होते.

पदव्युत्तर अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात तिसऱ्या दशकामध्ये म्हणजेच १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीमध्ये, प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांच्या पुढाकारातून मोठ्या संख्येने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु झाले होते. यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध विषयातील एम. ए. आणि एम. एस्सी. अभ्यासक्रमांचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीत हा एक महत्वाचा टप्पा होता. या तिसऱ्या दशकांमध्ये सुद्धा महाविद्यालयात आणखी काही संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीच्या चौथ्या दशकात, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०००-२००१ ते २००९-२०१० या कालावधीत महाविद्यालयात आणखी काही पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली.

महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच, संशोधनाला सुद्धा महत्त्व देणे आवश्यक आहे. अशी आग्रही भूमिका प्रा. डॉ. एकबोटे यांची असल्यामुळे या दशकामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा मान्यताप्राप्त विविध विषयांची संशोधन केंद्रे महाविद्यालयात सुरु करण्यात आली होती. या दशकातील शैक्षणिक वर्ष २००२-०३ मध्ये, राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर, द्वारा महाविद्यालयाचे प्रथम मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते. अशा प्रकारचे मूल्यांकन अगदी सुरुवातीच्या काळात करणाऱ्या मोजक्या महाविद्यालयांमध्ये मॉडर्न महाविद्यालयाचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील संख्यात्मक व गुणात्मक प्रगतीची योग्य दखल घेऊन, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाद्वारा महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार, शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये प्रदान करण्यात आला होता. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रशासन आणि संस्थेचे व्यवस्थापन या सर्वांच्या दृष्टीने हा पुरस्कार खूप प्रेरणादायी तसेच आनंद व समाधान मिळवून देणारा होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या चौथ्या दशकामध्ये, शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये, नॅक, बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे दुसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले. त्यावेळी महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला.

राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर यांच्या द्वारा आलेल्या पियर टीम मधील सदस्यांनी, महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या उत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराची त्यावेळेस विशेष दखल घेतली होती. या द्वितीय मूल्यमापन व मूल्यांकन होण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर, महाविद्यालयामध्ये अनेक विशेष सुविधा निर्माण करण्यात आल्या.अनेक विभागांचे नूतनीकरण सुद्धा करण्यात आले. यामुळे या चौथ्या दशकामध्ये महाविद्यालयामध्ये संशोधन कार्य चांगल्या प्रकारे झाले. त्याने, गुणवत्तापूर्ण संशोधन कार्याचा वेगही वाढला.




महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या यशस्वी वाटचालीच्या पाचव्या दशकामध्ये, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ ते २०१९-२०२० या कालावधीमध्ये प्रा. डॉ. एकबोटे व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयात एम. ए. (इंग्रजी, भूगोल, अर्थशास्त्र, मराठी, मानसशास्त्र, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, बायोटेक्नोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, ॲनॅलिटिकल केमेस्ट्री, संख्याशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स) एम. सी. ए. (सायन्स) तसेच बॉटनी, झूलॉजी, मराठी, कॉमर्स, लाईफ सायन्स, अर्थशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायोलॉजी या विषयांमध्ये (पीएच.डी.) संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे PGDFT, PGDT, PGDBF, Fashion Design हे Add-on अभ्यासक्रम चालविले जातात. अनेक नाविन्यपूर्ण सुविधाही निर्माण करण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा, महाविद्यालयाला 'स्वायत्त महाविद्यालय' हा दर्जा प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीच्या वाटचालीमध्ये हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ, आयसर, पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संस्थेच्या सामूहिक प्रयत्नाने, महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. ब्लेंडेड बायोसायन्स हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. पाचव्या दशकांमध्ये दरवर्षी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित करणेही आणखी चांगल्या प्रकारे सुरुच राहिले आणि अनेक संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आले.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोणताही नवीन अभ्यासक्रम तयार केला, की तो मॉडर्न महाविद्यालयात प्रथम सुरु केला जातो. हे वैशिष्ट्य महाविद्यालयाने आज पर्यंत जपलेले आहे व पुढेही ते जपले जाईल. शैक्षणिक वर्ष १९८६-८७ मध्ये त्यावेळेच्या पुणे विद्यापीठाने बीसीएस हा संगणक शास्त्राचा पदवी अभ्यासक्रम तयार केला होता. हा अभ्यासक्रम त्याच शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयामध्ये यशस्वीरीत्या सुरु करण्यात आला.**